# A.V.E.SOCIETYS DEGLOOR COLLEGEDEGLOOR DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE B.A. THIRD YEAR



प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड ४३१७१७
इमेल : ratnakarlakshete1@gmail.com
Mobile No.: 9423439276

# बी.ए.तृतीय वर्ष
# राजकीय विचारप्रणाली

## THEORY OF SURPLUS VALUE
## अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत

- प्रास्ताविक
- मार्क्सच्या या सिद्धांताला नफ्याचा सिद्धांत या नावाने ही ओळखतात.
- मार्क्सने दास कपीटल या ग्रंथात या सिद्धांताचे विवेचन व विश्लेषण केले आहे.
- मार्क्सच्या या सिद्धांतावर ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ रिकार्डो माल्थसच्या विचाराचा प्रभाव आहे.
- रिकार्डो माल्थसच्या मते कोणत्याही वस्तूचे मुली श्रमावर आधारित असते .
- मार्क्सच्या मते प्रत्येक श्रमिक अतिरिक्त मूल्याची निर्मिती करतो .
- वेपरच्या मते मार्क्सचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत रिकार्डो माल्थसच्या सिद्धांताचे व्यापक रूप आहे.
- लेनिनने मार्क्सच्या अतिरिक्त मूल्याचा सिद्धांताला अर्थशास्त्रीय शिक्षणाची आधारशीला म्हटले आहे.
- भांडवलशाही व्यवस्था श्रमिकांचे कश्या प्रकारे शोषण करते हे दाखवून देण्यासाठी हा सिद्धांत मांडला आहे.

# अतिरिक्त मूल्याचा सिद्धांताचे प्रतिपादन खालील प्रमाणे केले

- त्याच्या मते प्रत्येक वस्तूचे दोन प्रकारचे मुल्य असते.
- उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य
- उपयोगिता मूल्य
- जी वस्तू मनुष्याची इच्छा पूर्ण करते
- जी वस्तू मनुष्यासाठी उपयोगी आहे.
- ती वस्तू मनुष्यासाठी महत्वपूर्ण व मूल्यवान आहे.
- वस्तूचे उपयोगिता मूल्य मानवी गर्जपुर्ती व त्यातून मिळणारे समाधान यावर आधारलेले आहे.
- उदा.वाळवंटामध्ये पाणी उपयोगी

- विनिमय मूल्य
- विनिमय मूल्य एका वस्तूच्या बदल्यात तेवढ्याच श्रमाची दुसरी वस्तू देणे किंवा वस्तूची अदलाबदल करने
- कोणत्याही वस्तूचे मूल्य म्हणजेच किंमत त्याला लागलेल्या श्रमाच्या आधारावर निश्चित होते.
- ज्या वस्तूवर श्रम होत नाही त्या वस्तूला मूल्य नसते.उदा.हवा,पाणी
- परन्तु सायकल मध्ये हवा भरण्यासाठी श्रम लागतात.त्यामुळे त्यास मूल्य द्यावे लागते.
- वस्तूवर केले जाणारे श्रम व वेळ यावर त्या वस्तूचे मूल्य ठरते असे मार्क्स म्हणतो.

# अतिरिक्त मूल्य

- वस्तू विकल्यानंतर भांडवलदाराला जो नफा मिळतो त्या नाफ्यास मार्क्स अतिरिक्त मूल्य म्हणतो.
- प्रत्येक कामगार आपली श्रम शक्ती विकतो व श्रमाच्या मोबदल्यात मजुरी प्राप्त करतो.
- अतिरिक्त मूल्य म्हणजे मजुराने निर्माण केलेल्या आणि त्याला मिळणाऱ्या मुल्यातील अंतर आहे.
- अतिरिक्त मूल्य म्हणजे श्रमिकांची केलेली पिळवणूक आहे.
- बाजारामधील वस्तूच्या किंमतीमधून मजुरांची मजुरी वजा केल्यास राहिलेली जी बाकी असते त्यास मार्क्स अतिरिक्त मूल्य म्हणतो.
- भांडवलदार श्रमिकाकडून जास्त काम करून घेतो व त्या मोबदल्यात त्यास कमी मजुरी देवून ही भांडवलदार अतिरिक्त मूल्य प्राप्त करतो

# अतिरिक्त मूल्य सिद्धांतातील दोष

- श्रमावर अतिरिक्त भर
- मुल्याऐवजी शोषणावर भर
- भांडवलदाराच्या इतर खर्चाकडे दुर्लक्ष
- बौद्धिक श्रमाकडे दुर्लक्ष
- मार्क्सचे भाकीत अयोग्य
- नुकसानीकडे दुर्लक्ष

# अतिरिक्त मूल्य सिद्धांताचे महत्व

- भांडवलदार व श्रमिक या दोन वर्गातील विषम परिस्थिती लक्षात आणून दिली.
- भांडवलदारांनी कामगारांच्या श्रमावर आपले विलासी जीवन कसे उभे केले ते या सिद्धांतातून मांडले.
- शोषणाचा सिद्धांत म्हणून हा सिद्धांत प्रचलित आहे.
- समाजातील श्रमिक वर्गात त्यांच्या शोषणाची जाणीव निर्माण करणारा हा सिद्धांत आहे.
- कामगारांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देणारा हा सिद्धांत आहे.
- भांडवलदारावर वचक आवश्यक आहे व श्रमिकांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा आणि कामगारांचे भांडवलदारानी शोषण करू नये हे सांगण्यात या सिद्धांताचे महत्व आहे.
- या सिद्धांताने कार्ल मार्क्सला अर्थशास्त्रज्ञ म्हणून मान्यता दिली .

# कार्ल मार्क्स







लेनिन



स्टॅलिन